# प्रसिध्दीपत्रक

## सिंधुदुर्ग जिल्हा परिषद लोकनियुक्त प्रशासनाचा रौप्य महोत्सव 2016-17

सा. पोलाजी, आर्ट मास्टर, आर्ट डायरेक्टर मु. वाफोली, बांदा, ता. सावंतवाडी हे सिंधुदुर्ग जिल्हयाचे सुपुत्र असून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे उत्तुंग व अफाट कार्यकतृत्व असलेले तथापि साधी रहाणी असलेले व्यक्तिमत्व आहे. सिंधुदुर्ग जिल्हा परिषद लोकनियुक्त प्रशासनाचा रौप्य महोत्सव 2016-17 मध्ये त्यांच्या कार्याचा सत्कार संपन्न होणार आहे.

दि. 05/11/2016 रोजी ख्यातनाम पोलाजी सरांचे चित्रकलेचे प्रदर्शन व रांगोळीचे प्रदर्शन सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सायंकाळी 3.00 ते 5.00 वा. आयोजित केलेले आहे. जि.प.शाळा ओरोस व न्यु इंग्लिश स्कूल ओरोस मधील सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक व पालक यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून सरांचे कला विषयक मार्गदर्शन, चित्रे, रांगोळी रेखाटनाचे कौशल्य, कलागुणांबरोबर, संस्कारक्षम जीवन व अन्य कौशल्ये अंगी रुजविण्याचा सुवर्णयोग आला असून त्यांना प्रत्यक्ष पाहण्याची व आपल्या मुलांना मार्गदर्शन मिळण्याची सुवर्णसंधी आपणास उपलब्ध होत आहे. या प्रसंगी सिंधुदुर्ग जिल्हयातील जि.प. व पं.स. चे सन्मा पदाधिकारी, सदस्य, अधिकारी व कर्मचारी इतर शाळांतील विद्यार्थी विद्यार्थीनी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन करणेत येत आहे.

श्री. साबाजी भगवान पोलाजी सर यांनी झोपडपट्टीमधील मुलांना कलेचे, रांगोळीचे धडे देताना परिसर स्वच्छता, व्यक्तिमत्व सुधारणा, पर्यावरण व शारीरिक स्वच्छतेचे महत्व पटवून दिलेच, त्याचबरोबर मुलांमधील कलागुणांना पैलू पाडून आंतरराष्ट्रीय दर्जाचे गुणवंत कलाकर्मी निर्माण केले आहेत त्या मुलांमध्ये साधारण पासून खास अशी प्रतिभा तयार केली. त्यांच्याप्रमाणे स्वत:ही एक आयडॉल अशी आपल्या शिष्यवर्गाची प्रतिमा तयार केलेली आहे.
चाणक्य मालिकेचे अभिनेते व दिगदर्शक असलेले डॉ. चंद्रप्रकाश द्विवेदी हे पोलाजी सरांचे शिष्य त्याचप्रमाणेमहाभारत मालिकेचे लेखक भालचंद्र झा सरांचेच शिष्य होत. सरांचे कला, शिक्षण, पर्यावरण क्षेत्रातील कार्य थोडक्यात खाली दिले आहे.

- <u>357 आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त</u>
- भूतपूर्व पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचेकडून 2 बक्षिसे
- भूतपूर्व पंतप्रधान इंदिरा गांधी यांचेकडून 25 बक्षिसे
- भूतपूर्व पंतप्रधान मोरारजी देसाई यांचेकडून 6 बक्षिसे
- भूतपूर्व राष्ट्रपती व्ही.व्ही.गिरी यांचेकडून 10 बक्षिसे
- भूतपूर्व राष्ट्रपती संजीव रेड्डी यांचेकडून 9 बक्षिसे
- भूतपूर्व राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांचेकडून 9 बक्षिसे
- भूतपूर्व राष्ट्रपती आर. वेंकट रमन यांचेकडून 4 बक्षिसे
- भूतपूर्व राष्ट्रपती शंकर दयाल शर्मा यांचेकडून 1 बक्षिस
- भूतपूर्व पंतप्रधान राजीव गांधी यांचेकडून 1 बक्षिस
- भूतपूर्व पंतप्रधान नरसिंह राव यांचेकडून 1 बक्षिस
- <u>3 आंतरराष्ट्रीय गोल्ड मेडल्स</u>
- नॅशनल सोसायटी फॉर क्लीन इंडिया अवॉर्ड फॉर चाईल्ड वेलफेअर अँण्ड गुड सिटिझन अवॉर्ड
- वि.स.खांडेकर एज्युकेशनल ट्रस्ट, मिडलसेक्स कल्चरल अँण्ड हेरिटेज कमिशन USA, प्लॅन्टींग ट्रीज अँण्ड सेव्ह ट्रीज, भारतीय विद्याभवन USA, जैन कनव्हेक्शन 1999 बायोग्राफीकल इन्क्लुजन मार्क्यूज पब्लिकेशन वर्ल्ड डायरी USA, दोहा कतार कल्चरल फेस्टिव्हल. आदिंचे अर्वाडस.
- <u>प्रदर्शने</u>- मॅक्स मुल्लर भुवन मुंबई, USA, न्युयॉर्क, न्युजर्सी, SBI न्युयॉर्क, नेहरु सेंटर आर्ट गॅलरी, हॉटेल शेराटॉन USA, हॉटेल ऑबेरॉय
- <u>भेटी</u> - USA, Belgium, UK, Israel, Canada, Qatar
- <u>TDD</u> - प्रशिक्षणे, सेमिनार,शिबीरे (पर्यावरण, चित्रकला, रांगोळी)
- <u>पुस्तक</u> - Architects and Builders of Modern India
- इंटेरिअर डिझाईन व सेटींग
- <u>संस्थापक</u> - श्री स्वामी समर्थ जीवन विकास संस्था मुंबई
- मुले, महिला, महिला हक्क याबाबत विशेष कार्य
- बेस्ट टिचर्स अवॉर्ड (बॉम्बे आर्ट अँण्ड स्पोर्टस) Lion Club of Juhu.
- देश विदेशात 15 Painting Exhibition.

| | |
|---|---|
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सा.) | सही/- |
| जिल्हा परिषद सिंधुदुर्ग | अध्यक्ष |
| | जिल्हा परिषद सिंधुदुर्ग |